**अर्ज निशाणी ७० खालील आदेश**
**(CNR MHSI080006512019)**

१. वादीतर्फे प्रस्तूत अर्ज महत्वाची कागदपत्रे हजर करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी प्रस्तूत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास हरकत घेतली आहे.

२. अर्ज, प्रतिवादी क्र.४ ते ६ चे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले.

३. कागदाची यादी नि.क्र.७१ प्रमाणे प्रस्तावित दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदर कामी प्रतिवादी क्र.४ कल्पना जयसिंग मोरे यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप तसेच दस्ताचे स्वरुप बघता सदर दस्त हा दाव्याच्या अनुषंगाने असल्याचे दिसून येते. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र.७० मंजूर करण्यात येतो.

२. वादीस कागदपत्रांची यादी नि.क्र.७१ प्रमाणे कागदपत्र दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2025.03.28 16:34:44 +0530

( टी. एच. शेख )

दिनांकः२८/०३/२०२५

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कणकवली.